सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT







बार्शी : भगवंत जयंतीनिमित्त राज्याचे मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते भगवंताची महाआरती करण्यात आली. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, माजी आ.राजेंद्र राऊत, नगराध्यक्ष तेजस्विनी कथले, विजयनाना राऊत, जिल्हाधिकारी कार्तिकेयन आदी. दुसऱ्या छायाचित्रात हभप ॲड.जयवंत बोधले महाराजांच्या हस्ते मुख्यमंत्र्यांचा पगडी, विणा व तुळशी हार देऊन सन्मान करण्यात आला. तिसऱ्या छायाचित्रात भगवंत देवस्थान पंचकमिटीच्या वतीने सरपंच दिलीप बुडुख व ट्रस्टींच्या वतीने श्री भगवंताची चांदीची मूर्ती देऊन मुख्यमंत्र्यांचा सन्मान करण्यात आला.

# बार्शी तीर्थक्षेत्र विकासाला शासनाचे पूर्ण समर्थन

## • मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली ग्वाही • ईश्वराकडे काही मागण्याची गरज नसते

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२८ एप्रिल-**

बार्शीच्या तीर्थक्षेत्र विकासाबाबत माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी शासनासमोर सादर केलेला तीर्थक्षेत्र विकास आराखडा पूर्णत्वास नेण्यासाठी शासनाचे पूर्ण समर्थन आहे, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. या आराखड्यात नमूद केलेल्या सर्व बाबी टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्यात येतील.

श्री भगवंत प्रकट दिनानिमित्त आयोजित महापूजाप्रसंगी बोलताना ते पुढे म्हणाले, बार्शीतील श्री भगवंत मंदिर हे अत्यंत प्राचीन असून त्याचा उल्लेख दहाव्या/अकराव्या शतकातही आढळतो. मंदिरासह परिसराचा सर्वांगीण विकास करुन एक प्रमुख तीर्थक्षेत्र म्हणून विकसित करण्याचा शासनाचा मानस आहे. येथील भगवंत मंदिर हे केवळ धार्मिक स्थळ नसून स्थापत्यकलेचा उत्कृष्ट नमुना आहे. इतिहास, संस्कृती आणि अध्यात्म यांचा संगम असलेले हे मंदिर जतन करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे, असे सांगत बार्शीच्या आध्यात्मिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक महत्त्वाचा त्यांनी मुक्तकंठाने गौरव केला.



ईश्वराकडे काही मागण्याची गरज नसते. ईश्वराच्या चरणी नतमस्तक झाल्यावर मनाला शांती मिळते आणि सर्व मनोकामना पूर्ण होतात. ईश्वरीय शक्ती आपल्याला मानसिक बळ देते. त्या बळाच्या जोरावर आपण कोणत्याही संकटाला सामोरे जाऊ शकतो, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, माजी आमदार राजेंद्र राऊत, जि.प.अध्यक्ष दीपक वैद्य, नगराध्यक्षा तेजस्विनी कथले, भगवंत देवस्थानचे सरपंच दादासाहेब बुडूख, सभापती मीनाक्षी रोंगे, कृउबा समितीचे चेअरमन विजय गरड, वर्षाताई ठोंबरे, कविता राऊत, हभप जयवंत बोधले, विजय राऊत, ॲड.रणवीर राऊत, महावीर कदम, रमेश पाटील, ॲड.आसिफ तांबोळी, अरुण बारबोले आदी उपस्थित होते.

### भक्ती, श्रध्दा, अध्यात्म यांची समृध्द परंपरा

सोलापूर जिल्ह्याची भूमी ही अत्यंत पवित्र आहे. बार्शी येथे राजा अंबरीषासाठी भगवान विष्णूंनी 'भगवंत' रुपात तर पंढरपूर येथे भक्त पुंडलिकासाठी 'विठ्ठल' रुपात अवतार घेतला. ही भूमी भक्ती, श्रध्दा आणि अध्यात्म यांची समृध्द परंपरा जपणारी आहे, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नमूद केले.

### श्री भगवंत मंदिराचे ऐतिहासिक महत्त्व

संस्कृतीचा आणि अध्यात्मिक ठेव्याचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवणे ही काळाची गरज आहे. बार्शीचा उल्लेख पुराणांमध्ये वारंवार आढळतो. विष्णुपुराणातही या स्थळाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे. दुर्वासा ऋषींचे गर्वहरणही याच भूमीत झाल्याचा उल्लेखही त्यांनी यावेळी केला.

**राजाभाऊ यांचे उज्ज्वल राजकीय भवितव्य :** श्री भगवंत प्रकटदिनी महापूजेसाठी उपस्थित राहण्याचा आग्रह माजी आमदार राजाभाऊ राऊत यांनी सातत्याने केला होता. त्या आग्रहाचा मान राखून आणि भगवंताच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी आपण येथे आलो. राजाभाऊ राऊत हे जनतेसाठी सातत्याने काम करणारे, संघर्षशील आणि लोकाभिमुख नेते आहेत. त्यामुळे त्यांना मोठ्या संधी मिळतील आणि त्यांचे राजकीय भविष्य भरपूर व उज्ज्वल आहे. भारतीय जनता पार्टीमध्ये अशा कार्यक्षम नेत्यांची निश्चितच कदर होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.



### दैनिक तरुण भारतच्या विशेष पुरवणीचे प्रकाशन

श्री भगवंत प्रकटोत्सव दिनानिमित्त दैनिक तरुण भारतने विशेष पुरवणी काढली. पुरवणीचे प्रकाशन भगवंत मंदिरात ह.भ.प.डॉ. जयवंत बोधले महाराज, देहूचे ह.भ.प.मोरे महाराज यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी देवस्थान ट्रस्टचे सरपंच दादा बुडून, विश्वस्त नानासाहेब सुरवसे, तभाचे बार्शी प्रतिनिधी अरुण बळप, उद्योजक गोरक्षनाथ यादव, चंद्रकांत करडे व इतर मान्यवर.




## घरकूल लाभार्थ्यांना घराच्या चावीचे वितरण

**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

बार्शी येथील श्री भगवंत मंदिर येथे श्री भगवंत प्रकट दिनानिमित्त आयोजित महापूजा मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या हस्ते करण्यात आली. त्यानंतर बार्शी शहरात प्रधानमंत्री आवास योजना व रमाई आवास योजनेअंतर्गत घरकूल लाभार्थ्यांना मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते घराच्या चावीचे वितरण करण्यात आले. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, सोलापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य, धाराशिव जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा अर्चनाताई पाटील, माजी आमदार राजेंद्र राऊत, जिल्हाधिकारी कार्तिकियेन एस., नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष श्रीमती तेजस्वीनी कथले आदी उपस्थित होते. विष्णु पुराणातही या परिसरात आढळून येतो. प्राचीन काळापासून आलेल्या लोकपरंपरा, अध्यात्म तसेच ऐतिहासिक व सांस्कृतिक ठेवा जपणे हे गरजेचे आहे. या सांस्कृतिक ठेव्याला जनतेपर्यंत आणण्यासाठी तयार करण्यात आलेल्या आराखड्याला मान्यता देण्यात येईल आणि श्री भगवंत मंदिर तीर्थ क्षेत्र विकास आराखडयातून या भागाचा विकास करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.



## मुख्यमंत्री अन् आ.देशमुख कुटुबियांत बंद दाराआड चर्चा

### शहरातील प्रश्नांवर सविस्तर संवाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मंगळवारी सोलापूर दौऱ्यावर आले असताना त्यांनी सभेपूर्वी आमदार सुभाष देशमुख यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. या भेटीमुळे स्थानिक राजकीय वर्तुळात चांगलीच चर्चा रंगली.

मुख्यमंत्री फडणवीस हे बार्शी येथील भगवंताच्या महापूजेनंतर हेलिकॉप्टरद्वारे सोलापूर विम ानतळावर दाखल झाले होते. त्यानंतर त्यांनी थेट देशमुख यांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतली.

यावेळी बाजार समितीचे संचालक मनीष देशमुख तसेच भाजपचे युवा नेते रोहन देशमुख यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांचा सत्कार करून स्वागत केले. यानंतर बंद दाराआड झालेल्या बैठकीत आमदार सुभाष देशमुख, मनीष देशमुख, रोहन देशमुख आणि मुख्यमंत्री फडणवीस यांच्यात सुमारे १५ ते २० मिनिटे सविस्तर चर्चा झाली. या चर्चेत सोलापूर शहरातील प्रलंबित प्रश्न, विविध विकासकामांची गती, पायाभूत सुविधांशी संबंधित मुद्दे तसेच स्थानिक राजकीय घडामोडींवर सखोल विचारविनिमय झाल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

विशेष म्हणजे, ही भेट कोणत्याही अधिकृत कार्यक्रमाचा भाग नसल्याने तिचे महत्त्व अधिक वाढले आहे. बंद दाराआड झालेल्या चर्चेतील मुद्दे गोपनीय ठेवण्यात आले आहेत. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या या भेटीमुळे सोलापूरच्या राजकीय वर्तुळात विविध तर्क-वितर्कांना उधाण आले असून, देशमुख कुटुंबीयांच्या राजकीय हालचालींवरही सर्वांचे लक्ष केंद्रित झाले आहे. आगामी काळात या भेटीचे परिणाम काय दिसून येतात, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

### कर्जाला कंटाळून आत्महत्येचा प्रयत्न

सोलापूर : मामाच्या कर्जाच्या पैशासाठी बँकेच्या लोकांनी तगादा लावल्याने एका इसमाने घराच्या दुसऱ्या मजल्यावरून उडी मारुन आत्महत्येचा प्रयत्न केल्याची घटना पंढरपूर येथील संत पेठ येथे सोमवार, दि.२७ एप्रिल रोजी घडली. समीर अलीसाब बागवान (वय-४२) असे त्यांचे नाव आहे. या घटनेत त्यांच्या दोन्ही पायास मार लागल्याने ते जखमी झाले. पंढरपूरच्या आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचार करुन पुढील उपचारार्थ भाऊ यासीन बागवान यांनी सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले.

### गळफास घेऊन एकाची आत्महत्या

सोलापूर : अज्ञात कारणावरुन एका ५९ वर्षीय इसमाने घराजवळील शेवग्याच्या झाडाला साडीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना दक्षिण सोलापूर तालुक्यातील होटगी स्टेशन येथे घडली. गोपीचंद मसाजी शिवशरण (रा. होटगी स्टेशन, ता.दक्षिण सोलापूर) असे गळफास घेतलेल्या व्यक्तीचे नाव आहे. मंगळवारी सकाळी घरासमोरील झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत त्यांचा मृतदेह आढळून आला.

## लाडक्या बहिणीला पैसे नको दररोज पाणी द्या

### मुख्यमंत्र्यांचा दौरा; घागर घेऊन महिला करणार होते निदर्शने, पोलिसांनी घेतले ताब्यात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सोलापूर दौऱ्यावर आले असताना संभाजी ब्रिगेडच्या महिला आघाडीच्या वतीने जिल्हाध्यक्ष मीनल दास यांच्या नेतृत्वाखाली आसरा चौकामध्ये मुख्यमंत्र्याना पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नावर लक्ष वेधण्यासाठी लाडक्या बहिणीला पैसे नको दररोज पाणी द्या या मागणीसाठी घागरी घेऊन आसरा चौकात निदर्शने करण्यात येणार होते.



तत्पूर्वी एमआयडीसी पोलिस स्टेशनच्या पोलिसांनी काही कामानिमित्ताने अक्कलकोट येथे गेलेल्या जिल्हाध्यक्ष मिनल दास, सरोजिनी माकाई, अनिता वाघमारे, शकुंतला माकाई, जयश्री रानसरजे यांना अक्कलकोट दक्षिण पोलीस स्टेशन येथे जाऊन ताब्यात घेतले. विजापूर नगर पोलीस स्टेशन येथे संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम यांना सकाळीच ताब्यात घेण्यात आले होते. सोलापूर शहराला गेल्या अनेक वर्षापासून सात आठ दिवसाआड पाणी मिळते आणि तेही रात्री उशिराने पाणीपुरवठा केला जातो त्यामुळे एक तर सोलापूरतील श्रमजीवी कष्टकरी मध्यमवर्गीय नागरिक काम धंदा करून थकून येतात आणि त्यात रात्री अकरा बारा वाजता पाणी सोडले जाते त्या जागरणामुळे अनेक महिला आजारी पडत आहेत.

महाराष्ट्र शासन लाडक्या बहिणीसाठी पंधराशे रुपये देते ते आरोग्यासाठी दवाखान्यातच खर्च होत आहेत त्यामुळे देवा भाऊ आम्हाला लाडकी बहिणीचे पैसे नको दररोज पाणी द्या या मागणीसाठी संभाजी ब्रिगेड महिला आघाडीच्या वतीने आसरा चौकात निदर्शने करण्यात येणार होते. पण एमआयडीसी पोलिसांनी अक्कलकोट येथे लोकेशन ट्रेस करत त्यांना अक्कलकोट दक्षिण पोलीस स्टेशन येथे नजरकैद करून ठेवले.

## गारमेंट असोसिएशनला दुबईत प्रदर्शन भरविण्यास सहकार्य करणार

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे ठोस आश्वासन**

**अत्याधुनिक गारमेंट पार्क उभारण्याचीही केली घोषणा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

सतत नऊ वर्षे युनिफॉर्म गारमेंट एक्जीबिशन भरवून सोलापूरचे नाव देशभर पोहोचविलेल्या सोलापूरच्या युनिफॉर्म गारमेंट असोसिएशन ला साता समुद्रापार असलेल्या दुबई येथे गारमेंट प्रदर्शन भरविण्या करिता सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचे ठोस आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

सोलापुरात गारमेंट पार्क उभारणीही भारतीय जनता पार्टी शहर-जिल्ह्याच्या वतीने आयोजित विजयी मेळावा व कृतज्ञता सोहळ्याच्या कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांनी केली आहे.

सोलापूर युनिफॉर्म गारमेंट असोशियनने दुबई येथे युनिफॉर्म गारमेंट प्रदर्शन भरविणे तसेच सोलापूरला एक अत्याधुनिक गारमेंट पार्कची उभारणी करणे तसेच सर्व शिक्षा अभियानांतर्गत जिल्हा परिषदेमार्फतच गणवेश पुरविण्याचे काम स्थानिक पातळीवर व्हावे या तीन प्रमुख मागण्यांकरिता सोलापूर गारमेंट मॅन्युफॅक्चर असोसिएशनने भाजपाचे ज्येष्ठ आ. सुभाष देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक घेतली आणि तशा आशयाचे निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले होते. आता मिळालेले हे ठोस आश्वासन केवळ आमदार सुभाष देशमुख यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळेच अशी कृतज्ञताही असोसिएशनने व्यक्त केली. सतत नऊ वेळा भरविण्यात आलेल्या देशांतर्गत युनिफॉर्म गारमेंट एक्जीबिशनला प्रचंड प्रतिसाद मि ळाला आहे. युनिफॉर्म गारमेंटचे मार्केटिंग देशाबाहेर होणे गरजेचे असल्याचे मत आम दार सुभाष देशमुख यांनी मुख्यमंत्र्यांसमोर व्यक्त केले होते. केवळ भाजपा शासनाच्या पॉलिसीमुळेच जिल्हा परिषदेच्या शालेय समिती मार्फतच गणवेश पुरवायचे किंवा वितरण करावे या सरकारने घेतलेल्या निर्णयामुळे सोलापूरला मोठ्या प्रमाणात रोजगाराची संधी उपलब्ध झाली.



यापूर्वी युनिफॉर्म गारमेंट असोसिएशनने सोलापूरसह मुंबई, हैदराबाद, बेंगलोर, वाराणसी अशा विविध मेट्रो सिटी मध्ये आपले युनिफॉर्म गारमेंट प्रदर्शन यशस्वीरित्या राबविले होते. त्याचेच परिणाम म्हणून गारमेंट असोसिएशनने आ. सुभाष देशमुख यांच्याकडे देशाबाहेर प्रदर्शन भरविण्याची योजना मांडली होती. आमदार देशमुख यांनी वारंवार प्रयत्न करून कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर हा विषय मांडला होता. त्याचेच परिणाम म्हणून की काय आज मुख्यमंत्र्यांनी युनिफॉर्म गारमेंट वितरण तसेच अत्याधुनिक गारमेंट पार्क आणि दुबईतील प्रदर्शन या तिन्ही मागण्या त्यांनी मान्य केले आहेत.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना याबाबतचे निवेदन व सोलापूरचे गारमेंट भेट देत असताना गारमेंट असोसिएशनचे अध्यक्ष सतीश पवार, सचिव प्रकाश पवार आणि माजी सचिव व मार्गदर्शक अमित जैन उपस्थित होते.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत


https://epaper.dainiktarunbharat.com/



## ज्ञानामृत आनंदलहरी-१४२६

**पाहिजे तें केलें । सहज प्रसंगीं घडलें ।।**

बऱ्याच गोष्टी, कार्ये माणूस इच्छा नसतांनाही करतो. अर्थात मनात नसतांनाही केवळ दुसरे करतात म्हणून किंवा इतरांना बरे वाटावे म्हणून माणूस करतो. त्याचबरोबर अनेक गोष्टी अतिशय ओढताण करून करतो. पूजा, पाठ, भक्ती, सेवा या बाबी ओढून ताणून करण्याची आवश्यकता नाही. सहजप्रवृत्ती म्हणून आपल्याकडून हे घडले पाहिजे. पण अनेक लोक ही सात्विक कार्ये मनाला, शरीराला क्लेश देऊन करतात. मनाला शरीराला क्लेश देऊन केली जाणारी कार्ये कोणासाठी करतो, याचे उत्तर माणसाला माहिती नसावे. खरे म्हणजे हे सर्व काही आपण आपल्यासाठीच करतो. मग आपण आपल्यासाठी आपल्या तना-मनाला क्लेश का द्यायचा? ज्या गोष्टी केल्याने आपणास आत्मशांती मिळते, समाधान लाभते ते करायला हवे. अशांत मनाने किंवा ताणाताण करून केल्याने खरे समाधान मिळत नाही. आपल्या अंत:करणाला समाधानाची अवस्था मिळवून देण्यासाठी सकारात्मक दृष्टीकोनातून सहजरित्या आवश्यक ते करणे योग्य असते. ओढून-ताणून किंवा इच्छेच्या विरुध्द किंवा केवळ करायचे म्हणून करणे योग्य नसते. सहजप्रवृत्तीने आवश्यक व योग्य ते करण्याणे समाधान लाभते. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात,



**पाहिजे तें केलें । सहज प्रसंगी घडलें।।**

भक्ती, पूजा, पाठ हा खरे म्हणजे इतरांना दाखविण्याचा विषय नाही. पण अनेक लोक हा विषय सुध्दा फारच विचित्र प्रकारे करतात. मनाच्या समाधानाऐवजी मानासाठी हा विषय दिखावात्मक दृष्टीकोनातून हाताळला जातो. मनाची शांती असेल व सकारात्मक दृष्टीची जोड असेल तर चांगल्या गोष्टी माणसाकडून सहज घडून जातात. जाणून बूजून किंवा ओढा-ताण करून संत महात्म्यांनी आत्मशांतीसाठी कांही केले नाही. आत्मशांती असण्यासाठी मनाची स्थिती समाधानी असायला हवी. त्याचबरोबर दृष्टी ही सकारात्मक असावी लागते. आत्मशांती ज्याच्याकडे आहे त्याला ईश्वरभक्तीसाठी वेगळे काही करण्याची गरज नसते. मूळात मनच असमाधानी असेल तर त्याच्याकडून चांगली गोष्टही चांगल्याप्रकारे घडत नाही. मनाची स्थिती कशी ठेवायची हे आपल्याच हाती असते. कारण मनाची स्थिती बिघडवण्याला प्रामुख्याने आपणच कारणीभूत असतो. ज्या गोष्टी, घटना आपल्या हाती नाहीत किंवा ज्यावर खूप विचार, चिंता करुनही उपाय निघत नाही किंवा ज्यात बदल होत नाही, त्यावर विचार करण्यात अर्थ नसतो. म्हणून मनाची स्थिती समाधानी ठेवण्याचा प्रयत्न करायला हवा. ज्ञानोबा-तुकोबांच्या कृपेत आपण वावरत असल्याने आपली दृष्टी सकारात्मक असणारच आहे. त्याचबरोबर आपल्याकडून सहजप्रवृत्तीने कर्म घडणार आहे. अशी अपेक्षा या प्रसंगी करण्यात संकोच वाटत नाही. सकारात्मक दृष्टी आनंदाचा आधारस्तंभ असत, हे याप्रसंगी लक्षात असावे. जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : बुधवार,**
**दि. २९ एप्रिल २०२६**
**विक्रम संवत् २०८३ ।**
**शके -१९४८**
**संवत्सर - पराभव**
**मास - वैशाख**
**ऋतु - वसंत ।**
**नक्षत्र- हस्त (२४.१५)**
**योग - हर्षण (२०.५०)**
**करण - कौलव (०७.१८)**
**राहू काल : बुधवार**
**दु. १२.०० ते १.३०**

**दिनविशेष :**
**प्रदोष.**
**१९३०: ब्रिटन आणि ऑस्ट्रेलियादरम्यान टेलिफोन सेवा सुरू**
**१९३३: प्रभात फिल्म कंपनीचा प्रसिद्ध 'सिंहगड' चित्रपट प्रदर्शित झाला.**
**१९४५: दुसरे महायुद्ध: इटलीतील जर्मन सैन्याने मित्र राष्ट्रांसमोर बिनशर्त शरणागती पत्करली.**



## राज्यस्तरीय ग्रीटिंग स्पर्धेत रोहिणी चौधरी यांचा गौरव

**पुणे, दि. २८ एप्रिल-**

आधार सोशल ट्रस्ट धायरी पुणेतर्फे सैनिकांसाठी आयोजित ग्रीटिंग कार्ड बनवण्याच्या राज्यस्तरीय स्पर्धेत रोहिणी चौधरी यांना उत्तेजनार्थ क्रमांक मिळाल्याबद्दल सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व शाल देऊन गौरविण्यात आले. तसेच इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी ग्रीटिंग कार्ड तयार करून पाठविल्यामुळे नू.म.वि.मराठी शाळेला ट्रॉफी प्रदान करण्यात आली. विद्यार्थ्यांनाही प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. विशेष म्हणजे हा सन्मान प्रसिद्ध बालसाहित्यिक एकनाथ आव्हाड यांच्या हस्ते त्यांना प्रदान करण्यात आला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून बीएसएफचे असिस्टंट कमांडंट प्रतिक वशिष्ठ, राष्ट्र सेवा दल संचालित शिक्षण प्रशासक मंडळाचे सचिव शिवाजी खांडेकर, नगरसेविका जयश्री भूमकर, नगरसेवक सचिन मोरे, स्वीकृत नगरसेवक निलेश कोंढाळकर उपस्थित होते. व्यासपीठावर चांदगुडे, नारायण पाटील, शीतल चाकणकर व स्पर्धाप्रमुख सोपान बंदावणे उपस्थित होते. चौधरी यांच्या या यशाबद्दल शाळा समितीचे अध्यक्ष मनोज भालेराव, नियमक मंडळाचे सदस्य सुरेश मंकणी, मुख्याध्यापिका स्मिता माळवदकर यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## सोरेगाव येथे युवकाची नायलॉन दोरीने गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

अज्ञात कारणावरून एका अठरा वर्षाच्या युवकाने घरातील लाकडी वाशाला नायलॉन दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना विजापूर रोड वरील सोरेगाव येथे सोमवारी रात्री आठ वाजता उघडकीस आली. मारुती संजय मंजाळ ( वय १८ वर्ष ,बसवेश्वर नगर , सोरेगाव ) असे त्या मयत युवकाचे नाव आहे. सोमवारी रात्री आठ सव्वा आठ वाजेच्या सुमारास सदर तरुण हा राहत्या घरात गळफास घेऊन दोरी तुटल्याने जमिनीवर पडलेल्या अवस्थेत घरच्यांना आढळून आला .ही खबर विजापूर नाका पोलिसांना समजली असता पोलीस हवालदार गायकवाड यांनी घटनास्थळी पोहोचून सदरचा मृतदेह येथील शासकीय रुग्णालयात रात्री साडेनऊ वाजता दाखल केला असता डॉक्टरांनी उपचारापूर्वीच मृत झाल्याचे घोषित केले.

# पालकांनो आरटीई प्रवेशासाठी धावपळ करू नका

### अंतिम दिवसाची वाट न पाहता संबंधित शाळेत प्रवेश घ्या; शिक्षण विभागाचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

शिक्षणचा हक्क कायद्यांतर्गत २५ टक्के राखीव जागांवरील मोफत प्रवेश प्रक्रियेचा अंतिम टप्पा सुरू झाला असून, पालकांसाठी आता अखेरची संधी उरली आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी ३० एप्रिलपर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून, सोलापूर जिल्ह्यात अद्याप ८०५ विद्यार्थ्यांचे प्रवेश प्रलंबित असल्याची माहिती शिक्षण विभागाने दिली आहे.

आरटीई लॉटरी प्रक्रिया ६ एप्रिल रोजी पार पडली, तर १० एप्रिलला निवड यादी जाहीर करण्यात आली. मात्र, अनेक पालकांना पसंतीची शाळा न मिळाल्याने त्यांनी अद्याप प्रवेश निश्चित केलेला नाही. परिणामी हजारो पालक 'तळ्यात-मळ्यात' असल्याचे चित्र आहे.शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे की, निवड झालेल्या पालकांनी शेवटच्या दिवसाची




वाट न पाहता तातडीने संबंधित शाळेत जाऊन आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करावी.

अर्ज करताना सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती व साक्षांकित प्रती घेऊन पडताळणी समितीकडे जावे आणि ऑनलाइन प्रवेश निश्चित झाल्याची पावती घ्यावी.

**३० एप्रिलनंतर पोर्टल बंद?**

ज्या विद्यार्थ्यांची निवड झाली आहे, त्या पालकांनी कोणताही विलंब न करता प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी. ३० एप्रिलनंतर पोर्टल बंद होण्याची शक्यता असून, त्यानंतर रिक्त जागांवर प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना संधी दिली जाईल

**- कादर शेख,** प्राथमिक शिक्षणाधिकारी.

**जिल्ह्याची आरटीई आकडेवारी**

एकूण शाळा : ९८६
उपलब्ध जागा : २,६७३
आलेले अर्ज : ६,७०२
लॉटरीत निवड : २,६७३
निश्चित प्रवेश : १,८६८
प्रलंबित प्रवेश : ८०५

## लिंगायत वधू-वर परिचय मेळाव्याचे रविवारी आयोजन

**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

महात्मा बसवेश्वर वधू-वर सुचक केंद्र, कुपवाड (सांगली) व जागतिक लिंगायत महासभा, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या रविवार, दि. ३ मे रोजी सकाळी ११ ते ४ मातोश्री लिं सौ. सिद्धवाबाई हत्तुरे संस्कृतिक भवन सोलापूर (हत्तुरे वस्ती, विमानतळा समोर, होटगी रोड) येथे राज्यस्तरीय लिंगायत उच्चशिक्षित वधू-वर पालक परिचय मेळावा आयोजित करण्यात आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष आप्पासाहेब शेगावे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

लिंगायत समाजातील सर्व पोट जातीतील वधू-वर पालक परिचय मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्याचे उद्घाटन बसवलिंग महास्वामी ( शिवयोगी मठ), स्वामीनाथ महास्वामी (किरीटेश्वर मठ) बसव केंद्राचे प्रमुख सिंधू काडादी, उद्योजक शंकरराव लिंगे (अध्यक्ष- अखिल भारतीय माळी संघ, महाराष्ट्र) यांच्या हस्ते व प्रदेश कार्याध्यक्ष, जागतिक लिंगायत महासभा महाराष्ट्र, विजयकुमार हत्तुरे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात येणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे पत्रकार रेवणसिद्ध जवळेकर, शिवानंद गोगाव (जिल्हा अध्यक्ष- जागतिक लिंगायत महासभा सोलापूर), राजश्री थळंगे (महिला जिल्हाध्यक्ष, जागतिक लिंगायत महासभा सोलापूर) सकलेश बाभूळगावकर, पत्रकार चन्नवीर भद्रेश्वरमठ, नामदेव फुलारी, उद्योजक रेवणसिद्ध बिजरगी, उद्योजक, सचिन शिवशक्ती, तुकाराम माळी (जिल्हा उपाध्यक्ष, जागतिक लिंगायत महासभा सांगली) सिद्धमल्लिकार्जुन संस्थेचे अध्यक्ष गणेश चिंचोळे, बसवराज दिंडोरे (युवा जिल्हा अध्यक्ष, जागतिक लिंगायत महासभा सोलापूर) सिद्धराम कटारे, (अध्यक्ष, लिंगायत महामंच सोलापूर शहर) आदी उपस्थित राहणार आहेत. मेळाव्याचे नियोजन अप्पासाहेब शेगावे, ओंकार हतुरे, श्रीशैल प्याडशिंगे, नागेश पडणुरे, निलेश पाटील, सुनील दलाल, प्रियांका शेगावे हे करत आहेत. समाज बांधवांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. या पत्रकार परिषदेला शंकरराव लिंगे, प्रियांका शेगावे, सुनील दलाल उपस्थित होते.

## डॉ. रणधीर शिंदे यांना डॉ. लक्ष्मीनारायण बोल्ली स्मृती साहित्य पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे शाखा सोलापूर व शेठ लोणकरणजी चंडक ट्रस्ट सोलापूर यांच्यातर्फे दरवर्षी डॉ. लक्ष्मीनारायण बोल्ली स्मृती साहित्य पुरस्कार देण्यात येतो. यंदा डॉ. रणधीर शिंदे यांना हा पुरस्कार जाहीर झाला आहे.



डॉ. रणधीर शिंदे यांना लवकरच महाराष्ट्र साहित्य परिषद पुणेचे अध्यक्ष योगेश सोमण यांच्याहस्ते देण्यात येणार आहे. डॉ. रणधीर शिंदे यांचे मराठी साहित्यात खूप मोठे योगदान आहे. ते मूळचे सोलापूरचेच असून सध्या समीक्षेच्या क्षेत्रात त्यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. ते शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासन ,लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अध्यासन, क्रांती अग्रणी जी डी (बापू) लाड अध्यासन, डॉ .एन डी पाटील लोकचळवळ अध्यासन यांचे समन्वयक आहेत. तसेच अन्यही संस्थांवर काम केले आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई, ग्रंथ प्रकल्प समिती महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई आदी संस्थावर काम केले आहे. त्यांचे एकंदर सात ग्रंथ प्रकाशित आहेत. जवळपास १९ संपादित ग्रंथ त्यांच्या नावावर आहेत. साहित्यिक विश्वात अनेक जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत. त्यांना पुरस्कारही खूप मिळाले आहेत. अशा विविधांगी साहित्यिक व समीक्षक असणाऱ्या डॉ. रणधीर शिंदे यांना डॉ. लक्ष्मीनारायण बोल्ली पुरस्कार शेठ लोणकरणजी चंडक ट्रस्टचे विश्वस्त व महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सोलापूर शाखेचे कार्याध्यक्ष किशोर चंडक , अध्यक्ष - मालती बंग आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या अध्यक्षा प्रा.श्रुतीश्री वडगबाळकर यांनी घोषित केला आहे.

यावेळी विश्वस्त राजेश चंडक, राहुल चंडक, वृणाल चंडक व महाराष्ट्र साहित्य परिषदेचे उपाध्यक्ष श्री दत्ताअण्णा सुरवसे, प्रमुख कार्यवाह डॉ नरेंद्र काटीकर, कार्यवाह वंदना कुलकर्णी, कोषाध्यक्ष बदिऊज्जमा बिराजदार, कार्यकारणी सदस्य शोभा बोल्ली, जे. जे. कुलकर्णी, डॉ.अर्जुन व्हटकर, गोविंद काळे, डॉ. सुवर्णा गुंड चव्हाण, डॉ. देविदास गुरव, फैय्याज शेख, भीमगोंडा पाटील उपस्थित होते.

## अमृतवचन : जैन मुनी विशालसागर महाराज

### सन्मानाचे बी पेरा, जीवन फुलवा

जीवनातील सुख-दुःखांचे चक्र अनादी काळापासून सुरू असून त्यामागील मूळ कारण आपल्या कर्मबंधनात दडलेले आहे, असे प्रतिपादन जैन तत्त्वज्ञानावर आधारित प्रभावी प्रवचनात मुनिश्री १०८ विशालसागरजी महाराज यांनी केले.



वालचंद शिक्षणच्या नवीन इमारतीत मार्गदर्शन करताना मुनीश्री म्हणाले, ''जसे कर्म, तसे फळ'' हा शाश्वत सिद्धांत लक्षात ठेवला, तर जीवन अधिक सुंदर, शांत आणि अर्थपूर्ण बनू शकते. यासाठी त्यांनी तीन मूलभूत सूत्रे मांडली अपेक्षारहित जीवन, निर्भय वृत्ती आणि अपमान सहन करण्याची अंतःशक्ती.मान-अपमानाच्या भावनांनी व्यापलेल्या जगात खरा विजेता तोच ठरतो, जो संयम आणि क्षमाशीलतेने प्रत्येक प्रसंगाला सामोरे जातो. अपमान सहन करण्याची ताकद ही दुर्बलतेची नव्हे, तर आत्मबलाची सर्वोच्च पातळी आहे. देव, शास्त्र, गुरु, माता-पिता आणि गुणी व्यक्तींचा सन्मान हा जैन संस्कारांचा पाया असून, त्यांच्या अवमानातूनच व्यक्तीच्या जीवनात अपमानाचे बीज रुजते, असे त्यांनी सांगितले. ''सन्मान करता येत नसेल, तरी अपमान टाळा,'' हा मूल्याधिष्ठित संदेश त्यांनी ठाम पणे मांडला. इतरांच्या यशात आनंद मानणे आणि त्यांच्या सन्मानात सहभागी होणे, हीच अंतःशुद्धीची खरी दिशा असल्याचेही त्यांनी नमूद केले. चंपापूरचे राजकुमार श्रीपाल यांच्या जीवनातील उदाहरण देत, अपमानाचे दूरगामी परिणाम आणि संयमाचे महत्त्व त्यांनी प्रभावीपणे स्पष्ट केले. चुकीने घडलेल्या अवमानासाठी प्रायश्चित्त आणि पश्चात्ताप हीच आत्मशुद्धीची खरी साधना आहे. कर्माचा उदय झाला की संकटे येणे स्वाभाविक असते; मात्र क्षमा, संयम आणि सातत्यपूर्ण प्रयत्न यांच्या बळावर प्रत्येक संकटाचे संधीत रूपांतर करता येते, असा आशावादी दृष्टिकोन त्यांनी मांडला. आधुनिक तंत्रज्ञानाच्या वाढत्या प्रभावामुळे अनुशासन ढासळत असल्याची खंत व्यक्त करत त्यांनी अनुभवातून शिकण्याची आणि अपयशालाही सकारात्मकतेने स्वीकारण्याची प्रेरणा दिली. शेवटी, ''सन्मानाचे बी पेरले, तर जीवन सन्मानानेच फुलते, या जीवनमूल्यपूर्ण संदेशाने प्रवचनाचा समारोप झाला.



## अखंड मराठा समाजाच्या वतीने नूतन जिल्हाधिकाऱ्यांच्या सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

जात पडताळणी संदर्भामध्ये मराठा समाजाच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन चर्चा करण्यात आली. समन्वयक रवी मोहिते, मनीष सूर्यवंशी व सहकारी सोलापूर जिल्हा व करमाळा तालुक्यातीलही बांधवांनी मिळून अखंड मराठा समाजाच्या वतीने नूतन जिल्हाधिकाऱ्यांच्या सत्कार केला.रवी मोहिते यांनी आपली भूमिका घेऊन जात पडताळणी संदर्भामध्ये मोठा भ्रष्टाचार होत आहे असेही कलेक्टर यांना सांगितल. कलेक्टर यांनी तात्काळ पडताळणी ऑफिस संदर्भामध्ये संबंधितांना तात्काळ फोन लावून जात पडताळणी तात्काळ करून मिळाव्या असे आदेश दिले. कुणबीधारकांच्या जात पडताळणी करताना वारंवार त्रृटी काढून प्रकरणे रिजेक्ट का होतात असाही प्रश्न यावेळी विचारला. या पुढील काळामध्ये अडचण येणार नाही असेही कलेक्टर यांनी आश्वासन दिले.

## बुध्द पौर्णिमेनिमित्त शुक्रवारी मिरवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

बुद्ध पौर्णिमेच्या निमित्ताने सोलापुरात १ मे रोजी भव्य देशभक्ती मिरवणूक काढण्यात येणार असून, जय भारत माता सेवा समिती, नवी दिल्लीच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष तथा राष्ट्रीय संत हवा मल्लिनाथ महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडणार असल्याची माहिती उद्योगपती सोमनाथ साखरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.



या मिरवणुकीत भगवान गौतम बुद्ध, महात्मा बसवेश्वर महाराज, छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना अभिवादन करत विविध वाद्यांच्या गजरात देशभक्तीचा जयघोष करण्यात येणार आहे. मिरवणुकीचा मार्ग शुक्रवार, १ मे रोजी सकाळी ९.३० वाजता बसस्थानकाजवळील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात होईल. त्यानंतर सकाळी १० वाजता पार्क चौकातील चार हुतात्मा पुतळ्यास अभिवादन करून मिरवणूक निघेल. डफरीन चौक, कामत हॉटेल चौक, व्हीआयपी रोड, संगमेश्वर कॉलेज, सात रस्ता चौक मार्गे गांधी नगर येथील हेरिटेज लॉन येथे मिरवणूक पोहोचेल.

उद्योगपती हणमंत कावळे यांनी नागरिकांना मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. देश वाचला तरच सर्व समाज, धर्म, पक्ष आणि कुटुंब सुरक्षित राहतील. जय भारत माता सेवा समितीच्या माध्यमातून ते हातात तिरंगा घेऊन अखंड देशप्रवास करत असून नागरिकांमध्ये संविधानिक कर्तव्यांची जाणीव निर्माण करत आहेत, असे डॉ. मृत्यूजय निलंगे यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस समितीचे अजय शिंदे, अप्पासाहेब बिराजदार, बसवराज बिराजदार, सुरेश म्हेत्रे, मल्लिनाथ एंटमनी, महेश रगटे, अरुण बडदलकर, शंकर कस्तुरे, विजय पाटील, अनिल पाटील उपस्थित होते.

## लग्न करतो म्हणत दहा वर्षांपासून लैंगिक अत्याचार; आरोपीस अटक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

तुझ्याशी लग्न करतो, तुला व तुझ्या मुलांना सांभाळतो असे २०१५ सालापासून सांगत एका ३४ वर्षीय महिलेवर वारंवार अत्याचार करून धर्म स्वीकारण्यास दबाव टाकल्याप्रकरणी एका ६२ वर्षीय आरोपीवर एमआयडीसी पोलीस ठाण्यात बलात्काराचा गुन्हा दाखल झाला आहे. अल्लाउद्दीन हसन अत्तार ( वय ६२ वर्ष,रा. सरवदे नगर, मुळेगाव रोड, सोलापूर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. याबाबत खुद्द पीडित महिलेने पोलिसात फिर्याद दिली आहे. मे २०१५ मध्ये पीडिता ही ज्या ठिकाणी कामाला होती. तेथे आरोपीची ओळख झाली. अल्लाउद्दिनने पीडितेला मी तुझ्याशी लग्न करतो, तुला व तुझ्या मुलांना सांभाळतो असे सांगून जवळीक साधत तिच्यावर वारंवार अत्याचार केला. त्यानंतर 'तु माझा धर्म स्वीकार, बुरखा घाल,घरातून बाहेर पडायचे नाही. जर ऐकले नाही तर तुला जीवे ठार मारून टाकेन असे म्हणत धमक्या दिल्या. यामुळे पीडिता ही दुसऱ्या ठिकाणी जाऊन राहू लागली. तेव्हा आरोपीने तेथेही जबरदस्तीने अत्याचार केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. दरम्यान या प्रकरणी गुन्हा दाखल होताच एमआयडीसी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. फौजदार वाघमारे हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.




## मुस्लिम वस्त्यांच्या विकासासाठी विशेष निधी देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

शहरातील मुस्लिम वस्त्यांमध्ये मूलभूत नागरी सुविधांचा गंभीर अभाव असल्याने धार्मिक स्थळे (दर्गा), कब्रस्तान विकास आणि ड्रेनेज व्यवस्थेच्या सर्वांगीण सुधारणेसाठी विशेष निधी मंजूर करण्याची मागणी शाब्दि सोशल अँड वेलफेअर असोसिएशनच्या वतीने केली आहे. फारूक शाब्दि यांच्या नेतृत्वाखाली महानगरपालिकेच्या आयुक्तांना निवेदन देण्यात आले. यावेळी रियाज खरादि, कोमारो सय्यद, सलीम पामा, याकुब शेख, अजहर शेख, सलीम बेलीफ, वसीम शेख, जुबेर कुरेशी, बशीर शेख, महिबुब अली कुरेशी, आमिर मुचाले, इसाक शेख, अखलाख कुरेशी, वसीम डी, जावेद बेगमपुरे उपस्थित होते.

# आसरा रेल्वे पूल परिसरातील अतिक्रमण हटविले

### महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कार्पोरेशनच्या पत्रांवर कार्यवाही

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

शहरातील आसरा रेल्वे पुलाच्या कामासाठी अतिक्रमणामुळे अडथळे येत होते. दोन वर्षापासून यासंदर्भात महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कार्पोरेशनकडून महापालिकेला पत्र व्यवहार केला होता. अखेर आज महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाने कारवाई करून तीन पक्क्या इमारती तीन पत्र्याची घरे आणि वॉल कंपाऊंड जेसीबीच्या साह्याने जमीन दोस्त केली.

शहरातील आसरा पूल (ब्रिज क्र. ४५८/५) प्रकल्पाला अतिक्रमणामुळे अडथळे निर्माण होत आहे. संबंधित विभागाकडून वारंवार पत्रव्यवहार करूनही कारवाई होत नव्हती. या संदर्भात रेल्वे प्रशासन (एमआरआयडीसी) व संबंधित यंत्रणांकडून २२ जुलै २०२२ पासून ते २९ जानेवारी २०२४ पर्यंत अतिक्रमण हटविण्याची मागणी महापालिकेकडे केली होती. मात्र कोणतीही ठोस कारवाई झाली नव्हती. अतिक्रमणामुळे प्रस्तावित पुलाच्या बांधकामाच्या कामात अडथळे येत होते. हा महत्त्वाचा शासकीय पायाभूत सुविधा प्रकल्प असल्याने, कामातील विलंबामुळे शासनावर आर्थिक भार वाढत आहे. नागरिकांच्या विकासकामांनाही फटका बसत आहे. या पार्श्वभूमीवर अधिकाऱ्यांनी तात्काळ हस्तक्षेप करून अतिक्रमण हटवावे, अशी मागणी महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कार्पोरेशनने केली होती. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार अतिक्रमण



प्रतिबंधक विभागाचे अधीक्षक जगन्नाथ बनसोडे यांच्या माध्यमातून अखेर आसरा रेल्वे पूल परिसरातील अतिक्रमणे हटविण्यात आली. महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागातर्फे पोलीस बंदोबस्तात आज ही मोठी बेधडक कारवाई करण्यात आली. अडथळा ठरणाऱ्या पाच पक्क्या इमारती, पत्र्यांची तीन घरे तसेच वॉल कंपाऊंड जेसीबीच्या साह्याने जमीनदोस्त केले. कारवाई पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती.




## पद्माकर कुलकर्णी यांचा जीवनगौरव पुरस्काराने सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ एप्रिल-**

मंगळवेढा येथील दैनिक दामाजी एक्सप्रेस या वृत्तपत्राच्या वतीने दिला जाणारा जिल्हास्तरीय सोलापूर भूषण जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक पद्माकर कुलकर्णी यांना अभिनेत्री स्मिता गोंदकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. शिक्षण, साहित्य, पत्रकारिता, सामाजिक, सांस्कृतिक आणि नाट्य अशा बहुविध क्षेत्रांतील त्यांच्या कामाची दखल घेऊन हा पुरस्कार देण्यात आला. सोहळ्याला ज्येष्ठ पत्रकार दिगंबर भगरे, हभप सुधाकर महाराज इंगळे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील सहकुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे, प्रा. प्रकाश जडे, मंगेश चिवटे, सेवासदन प्रशालेच्या पर्यवेक्षिका स्वाती पोतदार आदींची प्रमुख उपस्थिती होती. कुलकर्णी यांचे उद्योजक दत्ता सुरवसे, माजी आमदार प्रकाश यलगुलवार, प्रा.श्रुती वडगबाळकर, डॉ. श्रीकांत येळेगावकर, कल्याण शिंदे, लहू ढगे, यतीराज वाकळे, तेजस्विनी कदम आदींनी अभिनंदन केले आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/


# भिसे-मुलाणी वादाचे सभागृहात पडसाद

## कुर्डुवाडी न.पा.सर्वसाधारण सभा | टोणपेंकडून जिल्हाप्रमुखांचा 'अलिबाबा' असा उल्लेख

- समान निधी वाटप केल्यास सहकार्याची भूमिका
- चार महिन्यात मी किती काम करणार : नगराध्यक्षा भिसे
- तीनशे कोटीचे काय केले ते जिल्हाप्रमुखांना विचारा : गटनेते मुलाणी

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डुवाडी, दि. २८ एप्रिल-**

पत्रकार परिषद घेवून नगराध्यक्षा काही काम करत नाहीत असे तुम्ही म्हणता, मग चार महिन्यात मी किती काम करणार असे भर सभागृहात नगराध्यक्षा जयश्री भिसे यांनी सांगून तुम्ही तीनशे कोटीचे काय केले अशी विचारणा राष्ट्रवादी काँग्रेस (अ.प.) पक्षाचे गट नेते समिर मुलाणी यांना केली. त्यावर त्यांनी ते जिल्हाप्रमुखांना विचारा ठणकावून सांगताच सभागृहात शांतता पसरली.

पाच-सहा दिवसांपासून नगराध्यक्षा जयश्री भिसे व गटनेते समिर मुलाणी यांच्यातील वाद -प्रतिवाद, दावे -प्रतिदावे प्रसार माध्यमावर येत आहेत. याचे पडसाद आज कुर्डूवाडी नगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये दिसून नगरपालिकेची सर्वसाधारण सभेसाठी उपनगराध्यक्षा सविता जगताप, मुख्याधिकारी सचिन तपसे उपस्थित होते. नेहमीप्रमाणे नगराध्यक्षा भिसे यांनी भटक्या कुत्र्यांचे लसीकरण व अनुकंपामधील भरती असे दोनच विषय ठेवले होते. लसीकरणाचा विषय मंजूर झाला. कक्ष अधिकारी बापू चोभे यांनी विषय वाचन केले. यावेळी गटनेते मुलाणी यांनी नगराध्यक्षांना तुम्ही पत्रकार परिषद घेवून राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक विरोध करतात असे सांगितले. यावर नगराध्यक्षांनीही अगोदर तुम्ही पत्रकार परिषद घेत नगराध्यक्ष काम करत नसल्याचा आरोप केला. शंभर दिवसाचा जाहीर आढावा मागितला. तुमच्या या पवित्र्यामुळे मी पत्रकार परिषद घेत तीनशे कोटीचा हिशोब मागितल्याचे सांगितले.



भिसे यांच्या तीनशे कोटींच्या हिशोबाच्या मुद्यावर धनंजय डिकोळे यांच्याकडे हातवारे करून शिवसेना जिल्हाप्रमुखांनाच विचारा असे मुलाणी म्हणाले. तेव्हा शिक्षण समिती सभापती संजय टोणपे यांनीही डिकोळे यांच्याकडे पाहुन अलिबाबा असा उल्लेख करत त्याला सर्व माहिती आहे असे एकेरी म्हटले. वाद वैयक्तिक स्वरूपामध्ये जात असल्याचे दिसताच विषयाला बगल देण्यासाठी डिकोळे तातडीने उभे राहिले. एकत्र आलो तरच सर्वांची कामे होतील त्यामुळे दोन्ही पक्षांना एकत्र येण्यासाठी भिसे यांच्याकडून डिकोळे यांनी टाळीसाठी हात पुढे केला.

> लोकवस्ती नसलेल्या ठिकाणी सहा कोटी रूपये मंजूर आहेत. डीपीडीसीच्या त्या निधीचे सर्व नगरसेवकांना समान वाटप झाले तर त्या नगरसेवकांना कामे करता येतील. जर असे होत असेल तरच कुर्डूवाडीच्या विकासासाठी सहकार्य करु.
>
> **- समीर मुलाणी**
> - गटनेता राष्ट्रवादी काँग्रेस. (अ.प.)

मात्र मुलाणी यांनी सहा कोटीच्या प्रमा रद्द करा व नव्याने सर्व नगरसेवकांच्या वार्डासाठी तीस-तीस लाखाचे वाटप करा असा खोडा घातला. यावर डिकोळे यांनी सभागृहाबाहेर सर्वजण चर्चेतून निर्णय घेवू असे सांगून वेळ मारून नेली.

मुलाणी यांच्याकडे पाहुन भिसे यांनी मी कोणाचेही काम अडवले नाही. उपनगराध्यक्षा जगताप, नगरसेवक अमर माने, पल्लवी कांबळे यांना विचारा. त्यांच्या प्रत्येक कामावर मी सही केली असल्याचे सांगितले. यावेळी भगवान महावीर पथ, बसवेश्वर महाराज पथ यांचे नामांतराचे

> शहराच्या विकासासाठी पालकमंत्र्याकडून डीपीडीसीतून सहा कोटी निधी आणला. मी विकासासाठी काम करत आहे. विरोधकांनी चौदा जणांच्या सह्यानिशी डीपीओ सोलापूरकडे प्रमा रद्दची मागणी केली आहे. ते रद्द करण्यासाठी प्रयत्न करत आहेत आणि मी जास्तीत जास्त निधी मिळवण्याचा प्रयत्न करत आहे. मी कोणत्याही प्रमा रद्द करणार नाही. तसे पाहिल्यास त्यांच्याशिवाय आमचे काही अडणार नाही, पण आमच्याशिवाय त्यांची अनेक कामे अडणार आहेत.
>
> **- जयश्री भिसे,**
> नगराध्यक्षा कुर्डूवाडी न.पा.

विषय आयत्यावेळी घ्यावेत अशी विनंती करून पालिकेत कामगार कमी व मुकादम जादा झाले असल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. यावर भिसे यांनी पुढच्यावेळी पाहु असे सांगितले. दरम्यान डिकोळे यांनी नगराध्यक्षांच्या मोबाईलवर मुलाणी हज यात्रेसाठी चालल्याचे कळवून त्यांचा सत्कार घेण्याचे सांगितले. भिसे यांनी मुलाणींना शुभेच्छा देवून सत्कार केला.

---

## महत्वाचे...



### ज्येष्ठ नागरिक संघाच्या अध्यक्षपदी विजय कुलकर्णी; वडतिले, आराध्ये सल्लागार

**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

ज्येष्ठ नागरिक संघाच्या (मेस्कॉन संलग्न) अध्यक्षपदी महापालिकेतील निवृत्त अभियंता विजय कुलकर्णी यांची बिनविरोध निवड झाली. सोलापूर ज्येष्ठ नागरिक संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच पार पडली त्यात ही निवड करण्यात आली. ही निवड २०२६ ते २०२९ अशा तीन वर्षासाठी असेल. याच सभेत नूतन कार्यकारणीही निवडण्यात आली. यावेळी नागनाथ पाटील, रमेश सोनी, गुरुलिंग कन्नूरकर आणि महादेव माने उपस्थित होते. नूतन अध्यक्षांचा मावळते अध्यक्ष घनश्याम दायमा यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. नूतन कार्यकारिणीमध्ये उपाध्यक्षपदी श्रीवल्लभ करकमकर, कार्याध्यक्ष रमेश सोनी, सचिव नागनाथ पाटील, सहसचिव सतीश पाटील, कोषाध्यक्ष अशोक गरड, संघटक निशा गोडबोले, कार्यकारणी सदस्य विजयकुमार अथणीकर, पन्नालाल चंडक, अरविंद जगताप, डॉ. राजीव मोहोळकर, विश्वास मोहिते, पांडुरंग आदोने, घन:श्याम दायमा, ॲड. राजेंद्र दीक्षित, गुरुलिंग कन्नूरकर, सल्लागार दत्ता आराध्ये, दशरथ वडतिले, महादेव माने, कमला शर्मा, विजयकुमार खंडेलवाल, बळवंत अहंकारी यांचा समावेश आहे.




### सनराइज स्कूलमध्ये गुणवंतांचा सत्कार

**टेंभुर्णी, दि. २८ एप्रिल-**

माऊली शिक्षण संस्थेच्या सनराइज इंग्लिश मीडियम गुरुकुल स्कूल, टेंभुर्णी येथे परिसरातील सीबीएसई दहावी परीक्षेत यश संपादन केलेल्या गुणवंतांचा सत्कार समारंभ तसेच करिअर मार्गदर्शन शिबीर पार पडले. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष योगेश बोबडे यांनी सांगितले की, करिअरच्या पुर्वतयारीसाठी विद्यार्थ्यांना बाहेरगावी जाण्याची गरज नाही. टेंभुर्णीतच माऊली शिक्षण संस्थेमार्फत सीईटी, जेईई, नीट यांसारख्या स्पर्धा परीक्षांची दर्जेदार तयारी करून दिली जाणार आहे. यानंतर सनराइज कायझन अकॅडमीचे संचालक विजय रॉबर्ट यांनी विद्यार्थी व पालकांना विविध शैक्षणिक शाखा आणि भविष्यातील संधी याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष योगेश बोबडे, सचिव सुरजा बोबडे, शैक्षणिक संचालिका शाहिदा पठाण, प्राचार्य प्रभाकर, प्राचार्य विकास करळे, विजय रॉबर्ट उपस्थित होते. सूत्रसंचालन अजित घोरपडे यांनी केले. आभार मोनाली अनंतवार यांनी मानले.



### आत्मनिर्भर वस्तीस्तर संघ बचत गटामार्फत वसुंधरा दिन साजरा

**टेंभुर्णी, दि. २८ एप्रिल-**

वसुंधरा दिनानिमित्त झाडे लावा झाडे जगवा हा संदेश देत आत्म निर्भर वस्तीस्तर संघाच्या अध्यक्षा सुनीता दळवी यांच्यातर्फे इंद्रप्रस्थ फेज थ्री येथे वृक्षारोपण करण्यात आले. उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण दुत मनोज देवकर यांनी झाडांची माहिती सांगितली. प्रास्ताविक अध्यक्षा सुनीता दळवी यांनी केले. यावेळी सहाय्यक पोलीस फौजदार गंगादेवी कौचाळे, अंबिका पवार, सोलापूर महानगरपालिका बचत गटाचे समूह संघटक सत्तेचीत वडार, अंबादास जाधव, इंदुमती भोसले, अनुराधा करपे, मीना खंडागळे, सविता सुलाखे, दीपा साळुंखे, सुनिता साळुंखे, प्रज्ञा कुलकर्णी, भारती सैदाने, गीता यादव उपस्थित होते. आभार प्रवासी सेवक संघटनेचे नंदू दळवी यांनी मानले.

### डोक्यात दगड घालून खून; प्रकरणातील आरोपीला चार दिवसांची पोलिस कोठडी

**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

दारूच्या नशेत झालेल्या वादातून डोक्यात दगड घालून खून केल्या प्रकरणात अटकेत असलेल्या आरोपी सोमनाथ नागराज जवळकोटे (वय ३१, रा. कलावतीनगर) याला आज सोमवार रोजी न्यायालयात हजर करण्यात आले असता त्याला ३० एप्रिलपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. रविवारी पहाटेच्या सुमारास कलावती नगर जवळील एका शाळेच्या कंपाउंड लगत नशेत किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून वरील आरोपीने महेश गुरुसिद्धप्पा सावळतोटे (वय २१, रा. सिद्धारामेश्वरनगर) याचा डोक्यात दगड घालून खून केला होता. त्यानंतर आरोपी हा दुसऱ्या दिवशी सकाळी स्वतःचं एमआयडीसी पोलीस ठाण्यात हजर झाला होता. सदर आरोपीला आज सोमवारी दुपारी येथील न्यायालयात हजर करत केले असता, त्याची चार दिवसासाठी पोलीस कोठडीत रवानगी करण्यात आली आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक दादासाहेब मोरे हे गुन्ह्याचा तपास करीत आहेत.

### खरीप हंगामपूर्व नियोजन आढावा बैठक

**सांगोला, दि. २८ एप्रिल-**

सांगोला तालुकास्तरीय खरीप हंगामपूर्व नियोजन २०२६ आढावा बैठक आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी पंचायत समितीच्या सभापती पुनम इंगवले, उपसभापती अजय सरगर, गट विकास अधिकारी वसंत फुले, कृषी अधिकारी बाबर, पंढरपूर उपविभागीय कृषी अधिकारी बाळासाहेब लांडगे, सहायक निबंधकचे पुजारी, महावितरणचे दिघे उपस्थित होते. खरीप हंगामपूर्व नियोजन तालुका कृषी अधिकारी दिपाली जाधव यांनी सादर केले. यामध्ये वर्षभर राबविण्यात येणाऱ्या मोहिमा, कृषी विभागाच्या सर्व योजना, मागील वर्षातील साध्य व सन २०२६-२७ या वर्षाचे नियोजन सादर केले. याप्रसंगी आ. डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी मनोगतात येणाऱ्या प्रतिकूल हवामानाशी सर्वांनी एकजुटीने सामना करूया व शेतकरी बांधवांना समृद्ध करूया असे मत व्यक्त करत येणाऱ्या खरीप हंगामाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. सदर बैठकीचे सूत्रसंचलन श्रीधर शेजवळ यांनी केले.

---



# भैरवनाथ शुगरचे चेअरमन अनिल सावंत यांचा घोडके कुटुंबाला आधार

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.२८ एप्रिल-**

तालुक्यातील खडकी येथे काही दिवसांपुर्वी आईसह तिच्या दोन चिमुकल्यांचा साठवण तलावात बुडून मृत्यू झाला होता. दुर्दैवी प्रसंगाने घोडके कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्या पार्श्वभूमीवर भैरवनाथ शुगर उद्योग समूहाचे चेअरमन अनिल सावंत यांनी तत्काळ खडकी येथे भेट देत घोडके कुटुंबियांचे सांत्वन केले.

अनिल सावंत यांनी घोडके कुटुंबीयांशी संवाद साधला. कठीण प्रसंगी त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत, असा विश्वास दिला. त्यांनी तातडीची आर्थिक मदत प्रदान करत कुटुंबाच्या गरजांचा विचार करून पुढील काळातही आवश्यक ते सहकार्य करण्याची ग्वाही दिली. अनिल सावंत यांची ही मदत केवळ आर्थिक नसून सामाजिक जाणीव आणि माणुसकीचा उत्तम नमुना असल्याचे नागरिकांनी भावना व्यक्त केली. यापूर्वीही ज्या ज्या ठिकाणी अशा प्रकारच्या दुर्दैवी घटना घडल्या आहेत, त्या प्रत्येक ठिकाणी स्वतः उपस्थित राहून मदतीचा हात देण्याची परंपरा त्यांनी कायम ठेवली आहे. त्यामुळे ते केवळ उद्योगपती नसून समाजाभिमुख नेतृत्व म्हणून ओळखले जात आहेत. दरम्यान अशा दुर्घटना टाळण्यासाठी प्रशासनाने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात आली. भेटीदरम्यान सखाराम बेलदार, हभप सुदर्शन महाराज, हौसाप्पा शेंबडे, संभाजी मस्के, युवराज बंडगर, बाबुराव ठोंबरे, गणेश रणदिवे उपस्थित होते.

# गुणवत्तेत तडजोड नाही : प्रा. झपके

**• नाझरा विद्यामंदिरात एनएमएमएस विद्यार्थ्यांचा सत्कार •**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २८ एप्रिल-**

सांगोला तालुक्यातील ग्रामीण भागात नाझरा विद्यामंदिर अव्वल आहे. माझी संस्था व शिक्षक विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील असतात. गुणवत्तेत कसल्याही प्रकारची तडजोड नसते, असे प्रतिपादन सां.ता.शि.प्र.मंडळाचे अध्यक्ष प्रा. प्रबुद्धचंद्र झपके यांनी केले.




ते नाझरा विद्यामंदिर प्रशालेत आयोजित एनएमएमएस परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात बोलत होते. व्यासपीठावर मुख्याध्यापक बिभिषण माने, सांगोला विद्यामंदिरचे मुख्याध्यापक अमोल गायकवाड, माजी मुख्याध्यापक संजीव नाकील, उपमुख्याध्यापक सय्यद, सांगली जिल्हा न्यायालयाचे अधीक्षक सपकाळ, पर्यवेक्षक विनायक पाटील उपस्थित होते. गुरुवर्य बापूसाहेब झपके यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविकात गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव बिभीषण माने यांनी केला. यावेळी मार्गदर्शक शिक्षक गुरुदेव उजनीकर, सोमनाथ सपाटे, मंजुश्री ओतारी, शुभांगी नागरसे व विभाग प्रमुख महालिंग पाटील यांना सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील जवंजाळ यांनी केले. आभार दिलीप सरगर यांनी मानले.

**या विद्यार्थ्यांचा झाला सन्मान**

कार्तिक शितोळे, ओमगोपाळ दीक्षित, सुजाता बाबर, प्रथमेश बाबर, सई मिसाळ, साक्षी सरगर, सोहम गिड्डे, आयुष कांबळे, श्रद्धा निंबाळकर, प्रथमेश केंगार, सुयश खांडेकर.

# अल्पवयीन मुलीस लग्नाचे आमिष; आरोपी निर्दोष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

अल्पवयीन मुलीस लग्नाचे अमिष दाखवुन दुष्कर्म केल्याच्या आरोपातुन आरोपी भैय्या कांबळे याची सत्र न्यायाधिश जे. जे. माहिते यांनी निर्दोष मुक्तता केली आहे. २१ डिसेंबर २०१७ रोजी दुपारी १२च्या सुमारास व त्यानंतर वेळोवेळी आरोपी भैय्या कांबळेने पिडीतेच्या घरी कोणी नसताना घरी येवुन मी तुझ्यासोबत लग्न करण्यास तयार आहे, असे अमिष दाखवुन शरीरसंबंध केले, अशी फिर्यादी पिडीतेने विजापुर नाका पोलिस स्टेशन येथे ७ ऑगस्ट २०१८ रोजी दिली होती.



फिर्यादीवरुन विजापुर नाका पोलिसांनी आरोपीविरुध्द बाल लैंगिक अत्याचारप्रमाणे येथील सत्र न्यायालयात दोषारोप दाखल केले होते. याकामी सरकार पक्षाने ७ साक्षीदार नोंदविले होते. परंतु सरकार पक्षांने आरोपीविरुध्द दाखल केलेले दोषारोप पत्रातील पुरावे व साक्षीदाराने नोंदविलेली साक्ष हे आरोपीचे विधीज्ञ ॲड. एस. एस. रायचूरकर यांनी युक्तीवाद करुन खोडून काढले. तसेच सरकार पक्ष आरोपीविरुध्द दाखल केलेला गुन्हा सिध्द करण्यास अपयश ठरला. आरोपीविरुध्द गुन्हा शाबित करण्याकामी सबळ पुराव्याअभावी न्यायालयाने २० एप्रिल २०२६ रोजी आरोपीस निर्दोष मुक्त केले. आरोपीतर्फे ॲड. श्रीशैल रायचूरकर, ॲड. एम. व्ही. फुलमाळी, ॲड. मनोज गुंडे यांनी काम पाहिले.

# जिल्ह्यातील परिमंडळ अधिकारी करतात रेशन दुकानदारांकडून जबरदस्तीने 'मंथली' वसुली?

## जिल्हा रेशन दुकानदार संघटनेकडून आरोप | शहर वितरण अधिकाऱ्यांना दिले निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

जिल्हा प्रशासनाकडून पुरवठा विभागाची पारदर्शकता येण्याकरिता अनेक योजना राबवित असताना मात्र अन्नधान्य वितरण कार्यालय सोलापूर अंतर्गत असलेल्या परिमंडळ अ विभागातील अधिकारी नंदकिशोर डोके हे रेशन दुकानदाराकडून जबरदस्तीने मंथली वसुली करत असल्याबाबतचा आरोप दुकानदार संघटनेने केला आणि याबाबतचे निवेदन अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे यांना दिल्याने या शहर पुरवठा विभागात चर्चेला उधान आले आहे.

परिमंडळ अधिकारी हे दुकानदाराकडून राजरोसपणे मंथली




वसुली करत असल्याच्या तक्रारी संघटनेकडे प्राप्त झाल्या असल्या मुळे अ विभाग संघटनेच्या वतीने अन्नधान्य धान्य वितरण अधिकारी ओंकार पडुळे यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे तक्रार देण्यात आली. प्रशासनाच्या वतीने विनाआधार व ई केवायसी सारख्या योजनेच्या माध्यमातून कार्ड रद्द झाल्याने रेशन दुकानदारांच्या कोट्यात कमालीची कपात झाली असताना त्या धर्तीवर दुकानदारांच्या कमिशनमध्येही कपात झाली आहे.दुकानदारांना दुकान भाडे, लाईट बिल, कामगार पगार, पेट्रोल कौटुंबिक उदरनिर्वाहसाठी पैसे कमी पडत असताना अशा अधिकाऱ्याकडून नाहक मानसिक त्रास देऊन वसुली होत असल्याने दुकानदार मेथाकुटीस आले असल्याचा आरोपही केला आहे. तरी अशा अधिकाऱ्यांची आपल्या स्तरावर योग्य ती चौकशी करून कारवाई करावी, अन्यथा लवकरच सोलापूर जिल्हा संघटनेच्या वतीने पुनम गेट जुने जिल्हाधिकारी कार्यालय येथे आंदोलन पुकारण्यात येईल, असा इशारा या निवेदनातून दिला आहे.

निवेदन देताना सोलापूर जिल्हा संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुनील पेंटर, जिल्हा उपाध्यक्ष वहाब शेख, राजशेखर जावळे, अ झोन अध्यक्ष अभिजीत सडडो, जिल्हाप्रमुख नितीन पेंटर यांच्यासह काही दुकानदार उपस्थित होते. आता अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे हे अश्या अधिकाऱ्यांवर काय कारवाई करणार? याकडे सर्व दुकानदाराचे लक्ष लागले आहे.

# अक्कलकोटमध्ये दलित वस्ती निधीचा गैरवापर

**▸▸ माजीमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांच्याकडून अधिकाऱ्यांच्या चौकशीचे सीईओंना निवेदन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ एप्रिल-**

अक्कलकोट तालुक्यात दलित वस्ती सुधारणा निधीच्या कथित गैरवापराचा प्रकार समोर आल्याने संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणी माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले.




दलित वस्ती सुधारणा निधी हा अनुसूचित जातीतील समाजाच्या वस्त्यांमध्ये रस्ते, गटारी, पाणीपुरवठा, वीज, स्वच्छता आणि इतर मूलभूत सुविधा उभारण्यासाठी वापरणे बंधनकारक आहे. मात्र काही गावांमध्ये हा निधी सवर्ण वस्त्यांमध्ये वळवल्याचा आरोप केला आहे. सरपंच, ग्रामसेवक आणि गटविकास अधिकाऱ्यांच्या संगनमतातून हा प्रकार घडल्याचे निवेदनात नमूद केले आहे. गावकऱ्यांनी या संदर्भात माहिती अधिकारातून व थेट प्रशासनाकडे माहिती मागितली होती. संबंधितांनी माहिती देण्यास टाळाटाळ केल्याचा आरोपही करण्यात आला. काही ग्रामस्थांना जीवे मारण्याच्या धमक्या दिल्याची धक्कादायक बाबही समोर आली आहे. त्यामुळे या प्रकरणाची गंभीरता वाढली आहे. माजीमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी सांगितले की, दलित समाजाच्या हक्काचा निधी परस्पर गायब केला जात आहे. याबाबत वारंवार विचारणा करूनही अधिकारी व प्रशासन दिरंगाई करत आहे, असे सांगत दोषींवर तातडीने कारवाई व्हावी, अशी मागणी केली.

दरम्यान, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी या तक्रारीची दखल घेत संबंधित विभागामार्फत सखोल चौकशी केली जाईल, असे आश्वासन दिले. आठ दिवसांनंतर पुन्हा भेट घेऊन अहवाल सादर करण्याचे निर्देशही त्यांनी दिल्याची माहिती समोर आली आहे. संबंधित प्रकरणानंतर शासकीय निधी खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचतो का, असा सवाल ग्रामस्थ विचारत करत आहेत. आता प्रशासन या प्रकरणात काय भूमिका घेते आणि दोषींवर कारवाई होते का, याकडे लक्ष लागले आहे.

**अधिकाऱ्यांकडून दखल घेतली जात नसल्याचीही तक्रार**

माहितीच्या अधिकारातून माहिती मागितली असता अपील घेणे बंधनकारक आहे. मात्र संबंधित गटविकास अधिकारी, ग्रामसेवक अपील घेत नाहीत. तारीख देत नाहीत. विचारणा केल्यास जीवी मारण्याची धमकी देतात, अशी तक्रार ही ग्रामस्थांनी नमूद केली आहे.

# बार्शी बसस्थानकावरुन महिलेचे गंठण लंपास

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २८ एप्रिल-**

बार्शी बसस्थानकावर बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेऊन एका चोरट्याने महिलेच्या गळ्यातील ५६ हजार रुपयांचे सोन्याचे मिनी गंठण चोरून नेले. ही घटना सोमवारी २७ एप्रिल रोजी दुपारी साडेबारा वाजेच्या सुमारास घडली. याप्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला

मीरा गिरीगोसावी (वय-४५, रा. शिवाजीनगर, वैराग, ता. बार्शी) या आपल्या मुलीला भेटण्यासाठी संभाजीनगर येथे गेल्या होत्या. सोमवारी दुपारी त्या संभाजीनगरवरुन परत येत असताना बार्शी बसस्थानकावर उतरल्या. तेथून वैरागला जाण्यासाठी सोलापूर-वैराग एस.टी. बसची वाट पाहत थांबल्या होत्या. दुपारी १२-३० वाजेच्या



सुमारास बस बसमध्ये बसल्या. बस स्थानकाबाहेर पडल्यानंतर त्यांनी गळ्यातील दागिन्यांची तपासणी केली असता, त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मिनीगंठण गायब असल्याचे दिसले. त्यांनी आजूबाजूला शोध घेतला आणि प्रवाशांकडे विचारणा केली, मात्र दागिना सापडला नाही. अखेर त्यांनी नातेवाईकांसह पोलीस ठाणे गाठून फिर्याद दिली.

चोरी गेलेल्या २० ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या मिनीगंठणची किंमत ५६ हजार रुपये आहे. बार्शी शहर पोलिसांनी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## गुरु ठाकुर यांचा अन्नछत्र मंडळातर्फे सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २८ एप्रिल-**

महाराष्ट्रातील प्रसिद्ध गीतकार संगीतकार लेखक अभिनेता अष्टपैलू व्यक्तिमत्व असलेले गुरु ठाकूर यांचा श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे भोसले यांच्या हस्ते श्री स्वामी समर्थांची मूर्ती व छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा भेट देऊन यथोचित गौरव केला. यावेळी



पंचरत्न फायनान्संचे संजय उर्फ लाला राठोड, सायबण्णा जाधव, शिवराज स्वामी, सरफराज शेख, मैनोद्दीन कोरबु उपस्थित होते.



## महत्त्वाचे...

### केमच्या उपसरपंचपदी अनिता वायभासे

**जेऊर, दि.२८ एप्रिल**

केम (ता. करमाळा) ग्रामपंचायत उपसरपंचपदी अनिता शरद वायभासे तर गटनेतेपदी सागर कुरडे यांची निवड करण्यात आली. यावेळी अच्युत काका पाटील, विष्णू पारखे, सागर दौंड, महावीर तळेकर, बाळासाहेब देवकर, संदीप तळेकर, महेश तळेकर, दादासाहेब गोडसे, दिलीप नाना दौंड, विलास बीचीतकर, आनंद शिंदे, सागरराज तळेकर, बापू तळेकर, सचिन काळे, सुलतान मुलाणी, योगेश ओहोळ, निखिल तळेकर, राजेंद्र देवकर, सोमा यादव, राहुल वायभासे उपस्थित होते. तसेच युवा परिवर्तनचे ग्रामपंचायत सदस्य गोरख पारखे, दत्तात्रय बीचीतकर, विजयसिंह ओहोळ, अन्वरनबी मुलाणी, अलका गोडसे, वंदना तळेकर, ऋतुजा ओहोळ, कमल अवघडे यांनी नव्या पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.



### साक्षी कावरे हिचे एनएमएमएस शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**बार्शी, दि. २८ एप्रिल-**

उपळे दुमाला येथील वखारिया विद्यालयाचे सन २०२५- २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या एन एम एम एस शिष्यवृत्ती परीक्षेत १० विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून साक्षी सतीश कावरे या विद्यार्थिनीने ११८ गुण मिळवून शिष्यवृत्तीधारक बनली आहे. तिच्या या यशाबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक दयानंद रेवडकर सर यांचे उपस्थितीत शिक्षक शंकर शिंदे, रमेश लंकेश्वर यांचे हस्ते विद्यार्थिनीचा, शिष्यवृत्ती परीक्षा प्रमुख अनिल वैद्य यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. पुढील चार शैक्षणिक वर्षासाठी साक्षी कावरे हिला १२ हजार रुपये प्रति वर्षाप्रमाणे शिष्यवृत्ती मिळणार आहे.





### गोमातेला राष्ट्रमातेचा दर्जा देण्याबाबत तहसीलदारांना निवेदन

**दक्षिण सोलापूर, दि. २८ एप्रिल -**

गो सन्मान अभियानांतर्गत सर्व गोभक्त, गोरक्षक व गोपालकांकडून दक्षिण सोलापूरचे तहसीलदार यांना गोमातेला राष्ट्रमातेचा दर्जा देण्याबाबत निवेदन देण्यात आले. गोमातेला राष्ट्रमाता दर्जा देणे, गोमातेची कत्तल शंभर टक्के थांबविणे याबाबत कायदा करण्याबाबत निवेदनात म्हटले आहे. यावेळी जिल्हाप्रमुख रोहित तापडिया, शिवानंद कल्लूरकर, सहप्रमुख परदेशी, साधू संत, रा.स्व. संघ, विश्व हिंदू परिषद, बजरंग दलचे पदाधिकारी, श्रीराम सेनेचे पदाधिकारी, सकल हिंदू समाज व गोसेवक महेश भंडारी, केतन शहा, गोपाल सोमाणी, सुधीर बहिरवडे, विजय यादव, शुभम साठे आदी गोरक्षक, दक्षिण सोलापूर व उत्तर सोलापूर तालुक्यातील सर्व गोशाळेचे पदाधिकारी, गोशाळा महासंघ सोलापूर जिल्ह्याच्या सचिवा उमा बिराजदार, कविता राठोड, महानंदा बिराजदार, वैशाली कुलकर्णी आदी गोभक्त उपस्थित होते .



### गो सन्मान आव्हान अभियानांतर्गत निवेदन

**सांगोला, दि. २८ एप्रिल-**

देशी गोमातेला राष्ट्रमाता दर्जा प्राप्त करवून घेण्यासाठी तसेच संपूर्ण हिंदुस्तान गो हत्या मुक्त करण्यासाठी गो सन्मान आव्हान अभियानांतर्गत सांगोला तहसील कार्यालय येथे निवेदन देण्यात आले. यावेळी डॉ. मानस कमलापूरकर, कुमार कुलकर्णी, कृष्णा कांबळे, हेमंत कुलकर्णी, दीपक कुलकर्णी, शुभम मदने, वैभव लेंडवे, बापू माने, सोमनाथ चव्हाण, सुनील चव्हाण, कपिल नलवडे उपस्थित होते.

### बेकायदेशीर पिस्टलसह अटक केलेल्या इसमास जामीन मंजूर

**बार्शी, दि. २८ एप्रिल-**

बार्शी तालुका पोलिसांनी १७ एप्रिल रोजीच्या मध्यरात्री गस्तीवर असताना शेंद्री ता.बार्शी येथील कुर्डूवाडी रोडवरील हॉटेल स्वामिनीसमोर शेंद्री येथील ऋषिकेश टिंगरे (वय २२) यास बेकायदेशीररित्या गावठी बनावटीचे पिस्तूल, लोखंडी तलवार आणि तीन कोयते यासह ताब्यात घेतले. त्याच्याकडे शस्त्र बाळगण्याचा कोणताही वैध परवाना नसल्याने त्याच्याविरुद्ध बार्शी तालुका पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला. याप्रकरणी आरोपीस प्रथम न्यायदंडाधिकारी रेवती बागडे यांच्या न्यायालयात हजर केले असता, दोन दिवसांची पोलीस कोठडी सूनावली होती. पुढील तपासानंतर आरोपीस पुन्हा न्यायालयात हजर करणयात आले. आरोपीच्यावतीने ॲड. विशाल गोणेकर यांनी जामिनासाठी न्यायदंडाधिकाऱ्यांकडे अर्ज सादर केला होता. यावर न्या. रेवती बागडे यांनी सरकार पक्ष आणि आरोपीच्या वकिलांच्या युक्तिवाद ऐकून आरोपीस जामिनावर मुक्त करण्याचा आदेश दिला. या प्रकरणात आरोपीच्या वतीने ॲड. विशाल गोणेकर, ॲड. अमोल अलाट, तसेच ॲड. पांडुरंग घोलप यांनी काम पाहिले.

# आजपासून सोलापुरात उष्णतेचा हाय अलर्ट!

## गेल्या आठवड्यापासून नागरिकांना करावा लागतोय उष्णतेशी सामना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

शहर व जिल्हयात मंगळवारी (दि. २८) उन्हाचा प्रचंड तडाखा असून, कमाल तापमान सुमारे ४३.६ अंश सेल्सिअस होते. तर दुपारच्या वेळी कडक ऊन आणि उष्ण वारे वाहत असल्याने नागरिकांना उष्णतेच्या लाटेचा सामना करावा लागला. दरम्यान, सोमवारीही ४३.९ अंशांवर तापमान होते तर बुधवारी हवामान विभागाने उष्णतेचा अलर्ट जारी केला असल्याने नागरिकांनी दुपारच्या सत्रात घराबाहेर पडू नये असे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, या आठवडाभरात तापमानाचा चढता आलेख दिसून येत असल्याने नागरिकांनी आरोग्याची काळजी घेण्याची गरज आहे.



आपत्ती विभागाकडून हाय अलर्ट जारी करण्यात आला असून, २९ एप्रिल ते १२ मे दरम्यान, सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत कोणत्याही व्यक्तीने (उघड्या आकाशाखाली) बाहेर जाऊ नये, कारण हवामान विभागाने सांगितले आहे की, तापमान ४५ अंश ते ५५ अंशापर्यंत जाऊ शकते. त्यामुळे जर कोणाला घुसमटल्यासारखे वाटले किंवा अचानक तब्येत बिघडली तर त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. घरातील दरवाजे उघडे ठेवा, जेणेकरून वायुवीजन होईल. मोबाईलचा वापर कमी करा, मोबाईल फुटण्याची शक्यता असू शकते. कृपया सावध रहा आणि इतरांना माहिती द्या. शक्यतो दही, ताक, बेलफळाचा रस इत्यादी थंड पेयांचा वापर करा.

नागरिक संरक्षण महासंचालनालयाकडून नागरिकांना आणि रहिवाशांना पुढील बाबींविषयी इशारा दिला आहे. त्यानुसार ४७ अंश ते ५५ अंशाच्या दरम्यान वाढणारे तापमान आणि पुढील काही दिवसांत क्युम्युलस ढगांच्या उपस्थितीमुळे बहुतांश भागात उष्ण व दमट वातावरण निर्माण होईल. त्यामुळे पुढील सूचना व काळजी घ्यावी. कारमधून गॅस साहित्य, लाईटर, कार्बोनेटेड पेये, परफ्यूम व बॅटरी असलेली उपकरणे, कारच्या खिडक्या थोड्या उघड्या ठेवा (वायुवीजनासाठी), कारची इंधन टाकी पूर्ण भरू नका, संध्याकाळी इंधन भरा, सकाळी कारने प्रवास टाळा, टायर जास्त फुगवू नका, विशेषतः प्रवासादरम्यान विंचू आणि साप यांच्यापासून सावध रहा, कारण ते त्यांच्या बिळातून बाहेर येऊन थंड जागा शोधण्यासाठी बागेत किंवा घरात येऊ शकतात. पुरेसे पाणी आणि द्रवपदार्थ प्या. गॅस सिलिंडर उन्हात ठेवू नका. वीजमीटरवर जास्त भार टाकू नका. घरातील वापरात असलेल्या भागातच एसी वापरा, विशेषतः उन्हाळ्यात. दोन ते तीन तासांनी ३० मिनिटे विश्रांती घ्या. त्यामुळे आरोग्य चांगले राहील. विशेषतः सकाळी १० ते दुपारी ३ दरम्यान थेट सूर्यप्रकाश टाळा, अशा सुचना नागरिकांना देण्यात आल्या आहेत.



## वाढदिवसानिमित्त अमोलराजे भोसले यांचा स्वामींचे कृपावस्त्र पांघरुन सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि.२८ एप्रिल-**

येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले यांचा वाढदिवस श्री. वटवृक्ष स्वामी महाराज मंदीरात मोठ्या उत्साहात व भक्तीभावात साजरा करण्यात आला. यावेळी देवस्थानच्या अतिथी कक्षात मंदीर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी त्यांचा वाढदिवसानिमीत्त श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र पांघरून व स्वामींचे प्रसाद मिठाई भरवून केला.यावेळी प्रथमेश इंगळे, मंदीर समितीचे विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, श्रीकांत मलवे, विपूल जाधव यांनीही अमोलराजे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी अमोलराजे म्हणाले, श्री. इंगळे व माझे पितामह श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेंजय (महाराज) भोसले व श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ परिवार हे सर्व आपण स्वामी सेवेत आहोत हे आपणा सर्वांसाठी खुप अभिमानाची बाब आहे. श्री.वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान व श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे स्वामी सेवेचे हे कार्य व सेवा करण्यास या पुढेही श्री स्वामी समर्थांचे आशिर्वाद नेहमीच आपणा सर्वांच्या पाठीशी असतील.

## श्री भगवंत प्रकटोत्सव संगीत सभा; भक्तिधाराचे सुरेल सादरीकरण

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २८ एप्रिल-**

ग्रामदैवत श्री भगवंत प्रकटोत्सवानिमित्त देवस्थान कमिटीच्या संगीत सभेत शनिवारी येथील श्री स्वामी समर्थ संगीत क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी अभंग व भक्तिगीतांची गायन सेवा सादर केली.

काव्या मांजरे हिने गायिलेल्या तुच सूर ठावा मजसी या गणेश भक्तिगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर काव्या पाटील, आराध्या निकम, दुर्वा जाधव, रियांश जाधव, विराज उबाळे, बाळासाहेब बारबोले, उज्वला कानकात्रे, मोनिका क्षीरसागर, मोहम्मद शेख, लक्ष्मी भंडारी, शीला बारवकर, संगीता महिमाने, लावण्या पाटील, गायत्री महाजन, राधिका कुलकर्णी, सुदर्शन शिरुरकर, हेमंत साने, मधुसुदन चांडक यांनी आपली



गायन सेवा सादर केली.


यामध्ये माझी रेणुका माऊली, गुरुवीण नाही दुजा, क्षणभर उघड नयन देवा, अबीर गुलाल, समाधी साधन, जगी जीवनाचे सार, सांब सदाशिव शंकर, कृपाळू हा पंढरीनाथ, अमृताहूनी गोड, विठ्ठल आवडी प्रेमभाव, तोरा मन दरपन, यशोमती मैया से, जन विजन झाले आम्हा, अजि मी ब्रम्ह पाहिले, रुणुझुणू रे भ्रमरा, पाव ना दत्ता, हे आदिमा हे अंतिमा या सारखी सुमधुर गीते प्रस्तुत केली. यावेळी कार्यक्रमाच्या मध्यांतरात ज्ञानेश्वरी पोळ यांच्या मार्गदर्शनाखाली भरतनाट्यम् वर्गाच्या विद्यार्थिनींनी अत्यंत लय-तालयुक्त नृत्याविष्कार सादर केला. क्लासच्या संचालिका दिपाली सहस्त्रबुध्दे यांनी लई नाही मागणं या जगद्गुरु तुकाराम महाराज रचित अभंग गायनाने कार्यक्रमाची सांगता केली. या सर्वांना प्रसाद सहस्त्रबुद्धे यांनी संवादिनीवर तर तुषार गदगी आणि कैवल्य सहस्त्रबुद्धे यांनी तालवाद्याची उत्तम साथ केली.

## आ. रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त मंगळवारी रक्तदान शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २८ एप्रिल-**

समाजसेवेचा एक महत्त्वपूर्ण उपक्रम म्हणून अकलूज येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित या उपक्रमामुळे परिसरातील गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे.

हे रक्तदान शिबिर मंगळवार, दिनांक ५ मे रोजी सकाळी ९.३० ते सायंकाळी ४.०० या वेळेत ग्रीनफिंगर्स आयुर्वेदिक हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, शंकरनगर-अकलूज येथे पार पडणार आहे. या शिबिरात रक्तदानाबरोबरच विविध आरोग्य तपासण्या देखील मोफत व अल्प दरात उपलब्ध करून देण्यात




आल्या आहेत.

शिबिरामध्ये नागरिकांसाठी मोफत रक्तदाब तपासणी, शुगर तपासणी, ईसीजी तसेच मोतीबिंदू शस्त्रक्रियेची सुविधा देण्यात येणार आहे. तसेच अल्प दरात सोनोग्राफी, एक्स-रे, पंचकर्म उपचार आणि चष्म्यांची सोयही करण्यात आली आहे. त्यामुळे या उपक्रमाचा लाभ सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या प्रमाणात होणार आहे. विशेष म्हणजे रक्तदात्यांना संस्थेमार्फत आकर्षक भेटवस्तू देऊन त्यांचा गौरव करण्यात येणार आहे. यामध्ये स्मार्ट वॉच, हेल्मेट, वॉटर कॅन, ट्रिमर/ग्रूमिंग किट तसेच इयरबड्स अशा उपयुक्त भेटींचा समावेश आहे.




आयोजकांकडून सर्व नागरिकांना या शिबिरात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. रक्तदान हेच श्रेष्ठ दान या संदेशातून समाजात जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून होत आहे.अधिक माहितीसाठी ९९६०४६४४५३ / ९५०३०६७४८० या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आयोजकांनी कळविले आहे.

# आयुष्मान कार्ड ई-केवायसी करण्यासाठी विशेष मोहीम

## गावागावात शिबिरे; १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण करण्याचे 'सीईओं'चे आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ एप्रिल-**

सोलापूर जिल्ह्यात आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी विशेष मोहीम हाती घेतली आहे. पात्र लाभार्थ्यांचे आयुष्मान कार्ड ई केवायसी शंभर टक्के पूर्ण करण्यासाठी गावनिहाय, तर शहरी भागात वॉर्डनिहाय विशेष शिबिरे होणार आहेत. सर्व विभागांना सक्रिय सहभागाचे निर्देश सी.ई.ओ.कुशल जैन यांनी दिले आहेत.




जिल्ह्यात या योजनेअंतर्गत सुमारे ४० लाख लाभार्थी आहेत. मात्र, २७ एप्रिल २०२६ पर्यंत केवळ १५.४४ लाख म्हणजेच ३८ टक्के लाभार्थ्यांचे ई केवायसी पूर्ण झाले आहे. उर्वरित लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळावा यासाठी प्रशासनाने युद्धपातळीवर मोहीम सुरू केली आहे. योजनेंतर्गत पात्र कुटुंबाला दरवर्षी ५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार देशातील मान्यताप्राप्त सरकारी व खासगी रुग्णालयात मिळतात. मात्र, त्यासाठी कुटुंबातील प्रत्येक सदस्याकडे स्वतंत्र आयुष्मान कार्ड आवश्यक आहे. त्यामुळे प्रलंबित ई केवायसी पूर्ण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. शासनाकडून लाभार्थ्यांना मोफत प्रिंटेड कार्डही उपलब्ध करून दिले जाणार आहे.

### घरबसल्या करू शकतात ई केवायसी

राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाने आयुष्यमान हे मोबाईल ॲप उपलब्ध करून दिले आहे. या ॲपच्या माध्यमातून लाभार्थी स्वतः किंवा इतरांच्या मदतीने आधार ओटीपी किंवा फेस ऑथेंटिकेशनद्वारे घरबसल्या ई केवायसी करू शकतात. तसेच महा-ई-सेवा केंद्र, आपले सरकार सेवा केंद्र, सी.एस.सी. केंद्र चालक, आशा सेविका आणि स्वस्त धान्य दुकानदारांनाही लॉगिन आयडी दिले आहेत.

### प्रत्येकांना जबाबदाऱ्या निश्चित

मोहिमेत तालुका पुरवठा अधिकारी, जिल्हा शिक्षण अधिकारी, गट विकास अधिकारी, नगर परिषद व नगरपंचायत मुख्याधिकारी, ग्रामसेवक, तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधीक्षक, आशा समन्वयक आणि सीएससी केंद्र चालक यांना जबाबदाऱ्या निश्चित केल्या आहेत. प्रत्येक गाव व प्रत्येक वॉर्डात लाभार्थ्यांची यादी तयार करून शिबिरांद्वारे ई केवायसी पूर्ण केले जाणार आहे.



### लाखो नागरिकांना आरोग्य सुरक्षा कवच

जिल्हा परिषद सोलापूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी सर्व विभागांनी समन्वयाने काम करून एकही पात्र लाभार्थी आयुष्मान कार्डाविना राहणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश दिले आहेत. महाअभियानामुळे लाखो नागरिकांना आरोग्य सुरक्षा कवच मिळणार आहे.

**- डॉ सतीश कोपूरवाड, जिल्हा आरोग्य अधिकारी.**

## बार्शीत फळ विक्रेत्यावर कोयत्याने हल्ला

### चौघांविरुद्ध गुन्हा; किरकोळ वादातून घडली हिंसा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २८ एप्रिल-**

येथील कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात किरकोळ कारणावरुन झालेल्या वादाचे पर्यवसान एका फळ विक्रेत्यावर जीवघेणा हल्ला होण्यात झाले. याप्रकरणी चौघांविरुद्ध बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.




रेहान शेख (वय-२१, रा. लहुजी वस्ताद चौक), सोनू सुपेकर (वय-१८, रा. यशवंतनगर), रितेश चव्हाण (वय-१८, रा. भाजी मंडई), बबलू ननवरे (वय-१८, रा. लहुजी वस्ताद चौक) अशी आरोपींची नावे आहेत. अभिषेक शिंदे (वय-२१, रा. नाळे प्लॉट, बार्शी) हे फळ विक्रीचा व्यवसाय करतात. २६ एप्रिल रोजी रात्री १२:३० च्या सुमारास, ते मार्केट यार्डातील लखन शेंडगे यांच्या दुकानासमोरुन आपली फळांनी भरलेली तीन चाकी रिक्षा नेत होते. यावेळी रस्त्यात उभे असलेल्या काही तरुणांना त्यांनी बाजूला सरका असे म्हटले. या साध्या बोलण्यावरुन चिडलेल्या तरुणांनी अभिषेक यांच्याशी हुज्जत घालण्यास सुरुवात केली. वादाचे रुपांतर हाणामारीत झाले. संशयित आरोपींनी फिर्यादीला रिक्षाबाहेर ओढून मारहाण केली.

मारहाण सुरु असताना, संशयित आरोपी रेहान शेखने कमरेला लपवलेला लोखंडी कोयता काढून अभिषेक यांच्या पाठीवर आणि डोक्याच्या उजव्या बाजूला गंभीर वार केले. यामध्ये अभिषेक रक्तबंबाळ झाले. भांडण सोडवण्यासाठी आलेले सागर खळदकर आणि तेजस खळदकर यांनाही आरोपींनी जखमी केले. पोलिसांची गाडी येत असल्याचे पाहून, चारही आरोपी दोन मोटारसायकलवरुन पसार झाले. पोलिसांनी जखमींना तत्काळ ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. शिंदे यांच्या फिर्यादीवरुन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल झाला.